# <u>पोलीस आयुक्तालय नवी मुंबई</u>

## <u>प्रेसनोट</u>

**2021**

**गुन्हे शाखा, नवी मुंबई**

दिनांक २३.०४.२०२१

**कोवीड—१९ या साथीच्सा रोगावर प्रभावी ठरणा—या व संपुर्ण भारतामध्ये तुटवडा असणा—या रेमडेसीविर इंजेक्शनचा गैरमार्गाने काळया बाजारामध्ये हजारो रूपये किंमतीत विक्री करणा—या रॅकेटचा मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा नवी मुंबई यांचेकडुन पर्दाफाश .**

---

मा. पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, अपर पोलीस आयुक्त डॉ. बी.जी.शेखर पाटील, नवी मुंबई यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये रेमडेसीविर इंजेक्शन काळा बाजार करून जनतेच्या जिवीताशी खेळुन एमआरपी पेक्षा जास्त भावाने विक्री करणा—या इसमांवर कायदेशीर कारवाई करणेबाबत आदेश दिले आहेत. त्यानुसार नवी मुंबई गुन्हे शाखेचे पोलीस उप आयुक्त श्री. प्रविणकुमार पाटील, सहायक पोलीस आयुक्त श्री. विनोद चव्हाण, गुन्हे शाखा, नवी मुंबई यांचे मार्गदर्शनाखाली मोहीम सुरू आहे.

दिनांक २१/०४/२०२१ रोजी लिटील वर्ल्ड मॉलचे समोरील रोडवर, सेक्टर ७ खारघर या ठिकाणी एक इसम हा कोवीड —१९ या साथीच्या आजारासाठी वापरात येणारे दोन रेमडेसीविर इंजेक्शन ४०,०००/— रू. किंमतीस विक्री करण्यासाठी येणार असल्याची खात्रीशिर बातमी मिळाली होती. वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक एन. बी.कोल्हटकर व पथकाने त्या ठिकाणी सापळा रचुन **इसम नामे हरपिंदर कपुर सिंग वय— ४१ वर्षे, धंदा— ट्रांन्सपोर्ट, रा. बल सोसायटी, बिल्डींग नं— जी—१, रूम नं— ०२, से—१०, कळंबोली, नवी मुंबई** यास ताब्यात घेतले. त्याचेकडे दोन REMDESIVIR INJECTION बेकायदेशीरित्या मिळून आले ते **दोन REMDESIVIR INJECTION तो ४०,०००/— रू किंमतीमध्ये विक्रीकरीता आला असल्याचे कबुल करून त्याबाबत त्याचेकडे कोणतेही कायदेशीर कागदपत्र नसल्याचे आढळुन आल्याने तो ते दोन REMDESIVIR INJECTION काळया बाजारामध्ये एमआरपी किंमतीपेक्षा जास्त किंमतीत विक्री करण्या करीता आल्याचे निष्पन्न झाले**. **त्याचे ताब्यातुन दोन REMDESIVIR INJECTION, एक मारूती सीयाझ कार, एक मोबाईल फोन व रोख रक्कम असा एकुण ५,१८,०००/— रू. किंमतीचा मुद्येमाल** जप्त केला असुन त्याचेविरूध्द् औषध निरीक्षक, एफडीआय रायगड यांचेशी संपर्क करून त्यांनी दिलेल्या तक्रारीवरून खारघर पोलीस ठाणे गु.रजि.नं. १५७/२०२१ भादवि कलम ४२० सह औषधे किंमत नियंत्रण आदेश २०१३ परिच्छेद २६ सह जिवनाश्यक वस्तुचे अधिनियम १९५५ चे वाचन अधिनियम ३(२)(सी), दंडनिय कलम ७(१)(अ)(II) सह औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा १९४० व त्याखालील नियम मधील कलम १८ (सी) चे दंडनीय कलम २७(ब)(II) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दि.

२२/०४/२०२१ रोजी आरोपीस अटक करण्यात आलेली असुन त्याची दिनांक २६/०४/२०२१ रोजी पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मिळालेली आहे.

गुन्हयाच्या पुढील तपासामध्ये अटक इसमाकडे मिळून आलेले दोन REMDESIVIR INJECTION हे नवी मुंबई मधील एका कोविड रूग्णालयामधुन तेथील डॉक्टर व नर्स यांनी संगणमत करून ७ ते ८ REMDESIVIR INJECTION बाहेर काळया बाजारामध्ये विक्री करीत असल्याचे आढळून आल्याने डॉक्टर सर्वजीत कमलकांत सिंग वय २७ वर्षे, रा. नेरूळ, नवी मुंबई, मुळ रा.बिहार यास दि.२३.०४.२०२१ रोजी अटक करण्यात आली असुन यामध्ये REMDESIVIR INJECTION काळया बाजारामध्ये विक्री करणारे मोठे रॅकेट उघड होण्याची शक्यता आहे.

सदरची कामगिरी मध्यवर्ती कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, एन.बी.कोल्हटकर, सपोनि. निलेश तांबे, सपोनि. ज्ञानेश्वर भेदोडकर, सपोनि गंगाधर देवडे, सपोनि विजय चव्हाण, सपोउपनिरी. संजय पवार, पोलीस अंमलदार अतिश कदम, उर्मिला बोराडे, सतिश सरफरे, विष्णु पवार, सचिन धनवटे, सचिन टिके, चापोना सतिश चव्हाण, मेघनाथ पाटील, राहुल वाघ यांनी केलेली असुन पुढील तपास मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा हे करीत आहेत.

★★★★★★★★★★


NAVI MUMBAI POLICE COMMSSIONERATE
CRIME BRANCH
CENTRAL UNIT
ASST.
ADIDA
मध्यवर्ती कक्ष, गुन्हे शाखा, नवी मुंबई